लोकमत

# जगण्याचा संघर्ष करणाऱ्यांच्या पाठीशी रहा

## मीना शेषू : शिवाजी विद्यापीठात कार्यशाळेत उलगडला परिघाबाहेरील स्त्रियांच्या संघर्ष

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कुटुंब, समाज आणि शासनाविरोधात कोणी बंड पुकारले की त्यांना परिघाबाहेर काढले जाते. त्या व्यक्ती अचानक समाजातून अदृश्य होतात. आपल्या स्वतंत्र अस्तित्वापासून ते अन्न, वस्त्र, निवारा, आधार, रेशन कार्ड अशा मूलभूत गरजांसाठीसुद्धा त्यांना मोठा संघर्ष करावा लागतो. आपल्या जगण्याचा संघर्ष करणाऱ्या प्रत्येक वंचित घटकापाठीमागे सर्वसामान्य नागरिकांनी राहिले पाहिजे, असे मत 'संग्राम' सामाजिक संस्थेच्या मीना शेषू यांनी व्यक्त केले. त्यांनी तृतीयपंथी व वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांनाच बोलतं करून त्यांच्या आयुष्यातील दाहक वास्तवाची जाणीव करून दिली.

शिवाजी विद्यापीठाच्या श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या वतीने गुरुवारी आयोजित केलेल्या 'परिघाबाहेरील स्त्रिया' या विषयावरील एकदिवसीय कार्यशाळेत मीना शेषू बोलत होत्या. कार्यशाळेचे उद्घाटन याच परिघाबाहेरील स्त्रियांच्या हस्ते रोपाला पाणी घालून झाले.



शिवाजी विद्यापीठात गुरुवारी श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्या वतीने झालेल्या कार्यशाळेत 'संग्राम' सामाजिक संस्थेच्या मीना शेषू यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी मान्यवर उपस्थित होते.

पहिल्या सत्रात निशा शिबूरकर यांनी परितक्त्या महिलांचे आयुष्य मांडले. त्या म्हणाल्या, मुलींवर बालपणापासूनच तू एका पुरुषावर अवलंबून आहेस, असे संस्कार केले जातात. लग्नात लाखो रुपये खर्चून डामडौल केला जातो; पण तिला सोडून द्यायची म्हटली की, नेसत्या वस्त्रानिशी घराबाहेर काढले जाते. पुरुषी मानसिकता, भिन्न वागणूक, स्वामित्व, हिंसा, संशय, मुलं न होणं, अशी विविध कारणं ती परितक्ता होण्यामागे आहेत. यातून बाहेर पडायचं असेल तर 'बाईची संस्कृती' नावाचं भूत प्रत्येकाच्या मानगुटीवरून उतरवलं पाहिजे.

पौर्णिमा चिकरमाने म्हणाल्या, सफाई कामगाराचे पाय धुण्याने त्यांचे आयुष्य बदलणार नाही, तर असंघटित क्षेत्रातील या फार मोठ्या समुदायाला त्यांचे हक्क मिळवून देणारे कायदे व त्यांची अंमलबजावणी केली पाहिजे.

सुशीला यादव यांनी घरेलू कामगार महिलांनी उभारलेला संघर्ष व त्यातून मिळालेले यश याची माहिती दिली. अध्यासनाच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील यांनी कार्यशाळेचा उद्देश विशद केला. आगामी काही दिवसांत अशाच पद्धतीने सामाजिक बदलाचे अनेक उपक्रम विद्यापीठाच्या माध्यमातून घेत असल्याचे सांगितले.

### आम्हाला हौस नाही असं जगण्याची

- तृतीयपंथी रोहिणी म्हणाली, आम्हाला हौस नाही असं जगण्याची. मलाही वाटतं सर्वसामान्य माणसासारखं जगावं. पँट-शर्ट घालावं, पण मी असं नाही करु शकत. मलाही माणूस म्हणून भावना आहेत. आम्हालाही वाईट वाटतं याचा समाज विचारच करत नाही.
- सेक्स वर्कर किरण म्हणाल्या, तुम्ही सगळे जसे कामाला जाता, नोकरी-व्यवसाय करता, त्याचप्रमाणे आम्ही घर चालवण्यासाठी हा धंदा करतो. मग कामगार म्हणून आम्हाला समाज का नाही स्वीकारत.

# 'यु. एस. न्यूज' रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठ दहावे



उजळाईवाडी, ता. १२ : यु. एस. न्यूज एज्युकेशन रँकिंगमध्ये शिवाजी विद्यापीठाने देशात १० वे स्थान प्राप्त केले. मेटेरिअल सायन्समधील संशोधनाची दखल घेऊन विद्यापीठाला हे स्थान देण्यात आले आहे. विशेष म्हणजे या यादीत भारतीय शैक्षणिक संस्थांमध्ये शिवाजी विद्यापीठ, आय.आय.टी आणि अन्य एका विद्यापीठाचा समावेश आहे. या सन्मानामुळे विद्यापीठातील संशोधनाची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतल्याचे स्पष्ट झाले.

हे रँकिंग देताना वेब ऑफ सायन्स या आंतरराष्ट्रीय संशोधनपत्रिकेतील संग्रहाचा संदर्भ घेण्यात आला आहे. २०१३ ते २०१७ या कालावधीत झालेल्या संशोधन गुणवत्ता, संशोधन पत्रिका, त्यांचे वापरलेले संदर्भ, त्याचा जागतिक संशोधनावर झालेला परिणाम या सर्व गोष्टींची पडताळणी केली आहे. विद्यापीठातील भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र व इतर अधिविभागांनी केलेल्या संशोधनास याद्वारे जागतिक मान्यता मिळाल्याचे दिसून येते. या अधिविभागांमध्ये गेल्या दोन दशकांपासून संशोधनाचे काम मोठ्या प्रमाणात सुरू आहे. मुख्यत्वेकरून सौरऊर्जा, ऊर्जा संचय, विषारी वायूंचे प्रमाण तपासण्याची प्रणाली, नॅनोमटेरियल यासारख्या विषयांवरील संशोधनाचा त्यामध्ये समावेश आहे. या संशोधनासाठी लागणारा भरघोस निधी, विविध योजनांमधून मिळालेल्या शिष्यवृत्ती यामुळे हे संशोधन करणे शक्य झाले. या यशाने विद्यापीठाच्या लौकिकात भर पडल्याची भावना व्यक्त होत आहे.